# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — 422003.

**EPABX : 0253-2592141, 2592142, 2592143 FAX : 0253-2599359**
**Email:nsksec@rediffmail.com**

परिपत्रक क्रमांक नाविमं / शाखा योग्यता प्रमाणपत्र / 2020–21 / 1591 दि.23 / 10 / 2020

विषय : शैक्षणिक वर्ष 2020–2021 मधील इ. 11 वी / इ. 12 वी वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्रस्तावांचे अर्ज स्विकारण्याच्या सुधारीत तारखांना मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ : 1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नियमावली 1977 नियम क्रमांक 79 व 80
2) परिपत्रक क्रमांक नाविमं / शाखा योग्यता प्रमाणपत्र / 2020–2021 / 1124 / 09 / 09 / 2020
3) राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क्र. रामं / समकक्षता / 4341 दि.13 / 10 / 2020

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सर्व मंडळ मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 च्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्या बाहेरील व भारताबाहेरील देशातून इ. 10 वी / इ. 11 वी समकक्ष सार्वजनीक परीक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष 2020–2021 मध्ये इ. 11 वी / इ. 12 वीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव प्राचार्यामार्फत पाठविण्यासाठी मार्गदर्शन सुचना यापुर्वी आपणांस कळविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या परिपत्रकातील मार्गदर्शक मुद्दा क्र. (क) नुसार कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे इ. 10 वी / इ. 11 वी / परीक्षांचे निकाल निर्धारीत वेळेपेक्षा उशिरा जाहीर झाल्याने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या सुधारीत तारखां यापुर्वी आपणास कळविण्यात आल्या आहेत.

तथापी सद्यःस्थितीत अद्यापही कोरोना साथीच्या रोगाचाा प्रादुरर्भाव असल्याने अन्य मंडळाकडून जाहीर झाल्येल्या निकाला संदर्भातील स्थलांतर प्रमाणपत्रे, गुणपत्रके इत्यादी कागदपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी अडचणी / अडथळे निर्माण होत असल्याने योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्याच्या सुधारीत तारखांना खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे जमा झालेले / होणारे योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव खाली दर्शविण्यात आलेल्या तारखांना मंडळ कार्यालयात हस्तपोंच सादर करावेत. त्रुटी असलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची कटाक्षाणे नोंद घ्यावी.

| तपशिल | या पुर्वीकळविलेली सुधारीत तरीख | वाढवलेली मुदत वाढ | चलन / डीडी काढण्याचा अंतीम दिनांक | यो. प्र. अर्ज कनिष्ठ महाविद्यलयानी मंडळास सादर करावयाचा दिनांक | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाकडे नियमित शुल्कासह | 16 ऑगस्ट ते 15 ऑक्टोबर | 16 ऑगस्ट ते 15 डिसेंबर | 15 डिसेंबर 2020 | 16 डिसेंबर 2020 वार बुधवार | नाशिक |
| विलंब शुल्कासह | 16 ऑक्टोबर ते 15 डिसेंबर | 16 डिसेंबर ते 15 फेब्रुवारी | 15 डिसेंबर 2020 | 17 डिसेंबर 2020 वार गुरुवार | जळगाव |
| अतिविलंब शुल्कासह | 16 डिसेंबर ते 31 मे पर्यंत | 16 फेब्रुवारी 31 मे पर्यंत | 15 डिसेंबर 2020 | 18 डिसेंबर 2020 वार शुक्रवार | धुळे / नंदुरबार |
| | | | 15 फेब्रुवारी 2021 | 16 फेब्रुवारी 2021 वार मंगळवार | नाशिक जळगाव धुळे / नंदुरबार |
| इ. 11 वी प्रस्तावातील आवश्यक त्रुटीची पूर्तता | इ. 11 वी–20 फेब्रुवारी इ. 12 वी–5 फेब्रुवारी | इ.11 वी 20 फेब्रुवारी 2021 इ. 12 वी 5 फेब्रुवारी 2021 | ——— | ——— | —— |
| इ. 12 वी साठी त्रुटी पूर्तता करण्यासाठी | 30 सप्टेंबर ही शेवटची तारीख | 30 ऑक्टोबर ही शेवटची तारीख | ——— | ——— | —— |
| राज्याबाहेरील किंवा परदेशातील / इतर मंडळातून उत्तीर्ण होवून आलेले विद्यार्थी इ. 12 वी मध्ये प्रवेश घेण्यास पात्र आहेत त्यांनी 15 सप्टेंबर पूर्वीच अर्ज सादर करणे | 16 ऑक्टोबर | 16 नोव्हेबर | ——— | ——— | —— |
| ज्या संस्थेचे नाव मंडळाच्या समकक्षता यादीमध्ये नाही किंवा सदर संस्थेस समकक्षमता नाही अशांचे प्रस्ताव | 11 वी साठी –30 डिसेंबर पूर्वी 12 वी साठी –30 सप्टेंबर पूर्वी | 11 वी साठी –30 जानेवारी पूर्वी 12 वी साठी –30 ऑक्टोबर पूर्वी | ——— | ——— | —— |

तरी उपरोक्त प्रमाणे केवळ या शैक्षणिक वर्षापूरत्या बदलेल्या सुधारीत तारखा संबंधित विद्यार्थी / पालक यांच्या निर्दशनास आणून द्याव्यात व त्याप्रमाणे योग्यती कार्यवाही करावी उपरोक्त तारखा केवळ तात्पुरत्या स्वरुपात आहेत पुढील वर्षी प्रचलीत दिनांकाप्रमाणेच कार्यवाही करावी. याची सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक–422003

प्रति,

1) नाशिक विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व मंडळ माण्यता प्राप्त कनिष्ठ माविद्यालयाचे प्रमुख.
2) विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
3) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नाशिक / धुळे / जळगाव / नंदुरबार.
4) लेखा शाखा / उच्च माध्यमिक परीक्षा विभाग, नाशिक विभागीय मंडळ.
5) राज्य मंडळ पुणे.